# महाराष्ट्र शासन
## कार्यालय, सहसंचालक, उच्च शिक्षण,अमरावती विभाग,
## (शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था परिसर) अमरावती -४४४ ६०४

Web: www.jdheamravati.org.in ☎ क्रमांक -०७२१-२९७०५४७ Mail-jdheamt@yahoo.com

जावक क्रमांक- ससं/उशि/अनु-२/परीपत्रक /२०२२/ ६०६२ दिनांक १९/१०/२०२२

**परीपत्रक / संकेतस्थळाव्दारे**

प्रति,

सर्व संबंधीत प्राचार्य, अशासकीय अनुदानित कला,वाणिज्य, विज्ञान
विधी,शिक्षण व शारीरीक शिक्षण महाविद्यालये,
अमरावती विभाग,अमरावती

**विषय:- अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दिनांक ०१.१०.२०१७ अखेरचा शिक्षक व शिक्षकेत्तर पदांचा आढावा.**

संदर्भ :-१. शासन पत्र क्रमांक आढावा १५१३/प्र.क्र./प्र.क्र.१२५/म शि ५ दिनांक ०४.०५.२०२२
२. मा. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक पदभ/११२१/प्र.क्र. १०/मवि-१/५४६५ दिनांक २०.०५.२२
३. मा. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक पदभ/११२१/प्र.क्र. १०/मवि-१/१२५२६ दिनांक १२.१०.२२

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय क्रमांक ०३ ची प्रत सोबत जोडली आहे. शासन निर्णय क्र आढावा १५१३/प्र.क्र. १२५(भाग-८) मशि-५ दिनांक १२.११.२०२१ अन्वये राज्यात एकूण २०८८ शिक्षकीय पदांच्या पदभरतीस मान्यता देण्यात आलेली आहे यानुषंगाने प्राचार्य व सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत.

तरी याबाबत पुनश्च कळविण्यात येते की, दिनांक ३१.१०.२०२२ पर्यंत आवश्यक सर्व कागदपत्रांसह पदभरती प्रस्ताव विहित पध्दतीने निश्चित प्राप्त होतील यास्तव कार्यवाही करावी अन्यथा संबंधीत महाविद्यालय पदभरतीसाठी नाहरकत प्रमाणपत्र मागणीकरीता इच्छूक नसल्याचे ग्राहय धरण्यात येऊन संबंधीत महाविद्यालयास पदभरतीसाठी अनुज्ञेय करण्यात आलेली पदे, पदभरतीसाठी मागणी केलेल्या अन्य महाविद्यालये / संस्थांना वर्ग करण्याबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल संचालनालयाने या कार्यालयास दिलेल्या सुचनेनुसार ही बाब निदर्शनास आणुन देण्यात येत आहे.

पदभरतीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र मागणीकरीता कोणत्याही स्वरुपाचा विलंब होणार नाही याची गांर्भीयाने नोंद घ्यावी.

सहपत्र :- संदर्भीय पत्र

( डॉ. केशव तुपे )
सहसंचालक,उच्च शिक्षण
अमरावती विभाग,अमरावती

प्रत :- मा. शिक्षण संचालक,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांना प्रत यांना माहीतीस्तव सविनय सादर